सरकारतर्फे साक्षीदार क्र.५ चा सरतपासः-

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - संध्या आनंद सुखदान उर्फ संध्या विलसन घोरपडे,
वय - २० वर्षे, धंदा - घरकाम,
राहणार - खुपटी, ता. नेवासा जि.अ.नगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.के.सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

मी आरोपींना ओळखते कारण त्यांचे व आमचे जमिनीवरून वाद झाले होते. फिर्यादी ही माझी आई आहे. घटना दि. ११/११/२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता, मौजे लाकेफळ येथे आमच्या घरासमोर घडली होती. त्यावेळी तिथेच होते. घटनेच्या दिवशी मनिषा शेंडे हीची सासु माझ्या आईसोबत गप्पा मारण्यासाठी आली होती. गप्पा मारत असताना मनिषा शेंडे म्हणाली की, ''काय गप्पा मारते?''. त्यानंतर तिथे बापु शेंडे आला व त्याने माझ्या आईला काठीने मारहाण करण्यास सुरूवात केली. मारहाण केल्यामुळे माझ्या आईला ओठाला मार लागला होता. त्यानंतर आम्ही पोलिस स्टेशनला गेलो. त्यांनी आम्हाला सरकारी दवाखान्यात पाठवले. त्यानंतर आम्ही पोलिस स्टेशनला गेलो. तिथे माझ्या आईची फिर्याद घेतली. आरोपी आजरोजी कोर्टात हजर नाही. माझ्या आईला ज्या काठीने मारहाण झाली ती पाहिल्यास मी ओळखु शकते. आता मला लाकडी काठी एम.ओ. 'ए' दाखवण्यात आला. तो तोच आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ जे.आर. नजन यांचेमार्फत सुरु

२. हे म्हणणे खरे आहे की, मी आजरोजी माझ्या आईच्या सांगण्यावरून साक्ष देण्यासाठी आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आईने सांगितल्याप्रमाणे जबाब दिला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझा जबाब घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझा जबाब व सही घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२० साली माझे वय १८ वर्षापेक्षा कमी होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी माझे शिक्षण चालु होते. हे म्हणणे खरे आहे की, मी शाळेत सकाळी ११.०० ते ०५.०० या वेळेत जात होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी ०५.०० वाजता घरी आले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी महात्मा जोतिराव फुले, माळीचिंचोरा या ठिकाणी शाळेत होते. हे म्हणणे खरे आहे की, शाळेपासुन घरी येण्यासाठी मला एक तास लागतो. मी जास्त शाळेत जात नसल्यामुळे घटनेच्या दिवशी घरी

होते.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे व आमचे जमिनीवरून पुर्वीचे वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, जमिनीच्या वादावरून माझ्या आईने आरोपींविरूध्द केस केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईने आरोपींविरूध्द किती केस केल्या हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी मी अज्ञान असल्याने त्यावेळी काय घडले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आई कोणत्या दवाखान्यात गेली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दवाखान्यात मी आईच्या सोबत नव्हते. पोलिस स्टेशनला मी व माझी आई गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर दिवशी माझ्या आईचा जबाब झाला किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. घटनेच्या दुस-या दिवशी पोलिस आमच्या घरी आले होते. पोलिसांनी माझ्याकडे कुठे चौकशी केली होती हे मला लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, किती पोलिस होते व कोण होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त काठी ही आम्ही पोलिसांना नेवुन दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, ती काठी आम्ही पोलिस स्टेशनला कधी नेवुन दिली याची तारीख व वार मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त काठी सारख्या काठ्या सरपणामध्ये उपलब्ध असतात. हे म्हणणे खरे नाही की, जप्त काठी आम्ही सरपणामधुन काढुन दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईला कधीही मारहाण केली नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी माझा विवाह झाला होता. मनिषा शेंडे म्हणाली ''काय गप्पा मारते?'' हा मजकुर मी पोलिसांना सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, 'तिथे बापु शेंडे आला व त्याने माझ्या आईला काठीने मारहाण करण्यास सुरूवात केली व मारहाण केल्यामुळे माझ्या आईला ओठाला मार लागला होता' हा मजकुर मी पोलिसांना सांगितला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या व आमच्या पुर्वीच्या वादामुळे मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटा जबाब दिला.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(श्रीमती.ए.एन.सरक)
दिनांक- १७/०३/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा